# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी ठाणे यांचे कार्यालय

(रेतीगट शाखा)

**४ था मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) — ४००६०१**

दुरध्वनी क्र.०२२-२५३४३६३६ ई-मेल — retigat.thane@gmail.com

---

## ई-निविदेसह ई-लिलाव सूचना

**सन २०१७-१८ करीता दिनांक ३० जून, २०१८ पर्यंतच्या मुदतीसाठी रेती/वाळू तृतीय फेरलिलाव.**

**यांत्रिक साधनाद्वारे वाळू / रेती उत्खननासाठी राखीव गटांकरीता दिनांक ३० जून, २०१८ पर्यंतच्या मुदतीसाठी ई निविदासह ई-लिलाव (सन २०१७-१८)**

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१ मे, २०१५ अन्वये निश्चित केलेले धोरण**

ठाणे जिल्ह्यातील ठाणे व कल्याण या तालुक्यातील खाडीमधील यांत्रिक साधनांद्वारे रेती उत्खननासाठी राखीव असलेल्या सोबतचे प्रपत्र-अ मध्ये नमुद केलेल्या ३ रेतीगटांच्या (१२ रेती उपगटांच्या) निर्गतीसाठी ई-निविदेसह "तृतीय फेरलिलावासाठी" ई- लिलाव पध्दतीचा अवलंब करण्यात येणार असून, सदर प्रक्रिया सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती धोरण दिनांक २१ मे, २०१५ अन्वये महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडील सी.आर.झेड. विषयक अनुमती, शासन पर्यावरण विभागाकडील पर्यावरण विषयक अनुमती व महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडील प्राधिकार पत्र ममेबो/मुकाअ/जआ/टी-९७x/यांत्रिक उत्खनन/ ठाणे/ २०१७-१८/८०२ दि.०४.०९.२०१७ व पत्र दि.१८/१०/२०१७ तसेच सर्व्हेक्षण अहवालामधील अटी व शर्तीस अधिन राहून राबविण्यात येणार आहे.

१. ई-निविदेसह ई-लिलाव प्रक्रियेसाठी ICICI बँक व ABC Procure ,अहमदाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२. या लिलावाच्या प्रक्रियेसंबंधी सर्व माहिती, वाळू/रेती उत्खननासंबंधी अटी व शर्ती यांची सविस्तर माहिती https://thaneco.abcprocure.com या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. या लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १ | ०१.०२.२०१८ | सकाळी १०.०० पासून | प्रक्रियेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींचे/संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ई-निविदा भरणे सुरु होईल. |
| २ | ०८.०२.२०१८ | सायं. ५.०० | ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल. |
| ३ | १२.०२.२०१८ | सायं. ५.०० | ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने स्विकारणे बंद होईल. |
| ४ | १५.०२.२०१८ | सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत | ई-लिलाव प्रक्रिया सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत. वेळ समाप्तीच्या वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीव्दारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ३ (तीन) वेळा वाढ करण्यात येईल. |
| ५ | १५.०२.२०१८ | - | उक्त लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर ई-निविदा डाऊनलोड करुन उघडण्यात येईल व ई-निवीदा/ई-लिलाव यातील उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल. |